Tel. No. : 2654 3300
2654 3000 / 2653 0280
Extn. : 3214

# University of Mumbai

**Enrolment Section**
Dr. Babasaheb Ambedkar Bhavan,
First Floor, Vidyanagari,
Santacruz (E), Mumbai - 400 098.
e-mail : dr@admn.mu.ac.in

No. Enrol./ 3462 / 2012
Date : 08/11/2012

## परिपत्रक

प्रति,
प्राचार्य,
मुंबई विद्यापीठाशी संलग्नित सर्व कला,
वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये / मान्यता प्राप्त संस्था.

महोदय / महोदया,

विद्यापीठाच्या पात्रता / स्थलांतर / नावनोंदणी विभागाकडे महाविद्यालये / मान्यता प्राप्त संस्था यांचे कडुन प्रस्ताव / पत्रे पाठविले जातात. सदर प्रस्ताव हे विद्यापीठाच्या विभागाकडुन तपासून घेतले जातात व त्यात त्रुटी आढळल्यास त्यांची विचारणा संबंधीत कर्मचा-यांकडे केली असता सदर कर्मचारी बहुतांशी शिपाई अथवा त्या विभागाचे कामकाज न पाहणारे असतात. सदर महाविद्यालयाच्या कर्मचा-यांना विद्यापीठातील कर्मचा-यांकडुन प्रस्तावाबाबतची माहिती विचारली असता संबंधितांना माहित नसल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे महाविद्यालयाला चुकीची माहिती जाते व गैरसमज निर्माण होतात. तसेच माहिती विद्यापीठात प्राप्त न झालेने प्रस्तावही स्विकारले जात नाहीत व प्रलंबित राहतात.

तरी आपणास आदेशान्वये कळविण्यात येते कि, यापुढे विद्यापीठाकडे प्रस्ताव / माहिती ही फक्त शिपाई दर्जाच्या कर्मचा-यांमार्फत न पाठविता महाविद्यालयातील नावनोंदणी व पात्रता प्रकियेतील संबंधीत व्यक्तिच किंवा जबाबदार व्यक्ति सदर अर्ज घेऊन यावी (शक्यतो मुख्यलिपीक / कार्यालयीन अधिक्षक), कि ज्यामुळे त्यांना येणा-या अडचणी संदर्भात योग्य मार्गदर्शन करता येईल व त्यामुळे प्रकिया वेळेत व सुलभरित्या पुर्ण करता येईल. कृपया याची नोंद घ्यावी.

आपला विश्वासू,

उपकुलसचिव
(नावनोंदणी विभाग)